शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१
१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७

## प्रसिध्दी पत्रक

**दिनांक ०८.०७.२०१६.**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ साठी ची दुसरी गुणवत्ता यादी केंद्रीय प्रवेश समितीमार्फत दि.०५.०७.२०१६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता ऑनलाईन जाहिर करण्यात आलेली आहे.

द्वितीय गुणवत्ता यादीनुसार ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार व पसंतीक्रमांकानुसार जे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहे अशा आज अखेर ७९९२ विद्यार्थ्यांनी अद्याप तात्पुरता प्रवेश घेतलेला नाही. तरी सदरच्या ७९९२ विद्यार्थ्यांनी द्वितीय गुणवत्ता यादीनुसार आपणांस मिळालेल्या त्या कनिष्ठ महाविद्यालयात दि.०९.०७.२०१६ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत रु.५०/- भरुन आपला तात्पुरता प्रवेश निश्चित करावा. असे यापुर्वी वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आलेले होते.

तथापि, मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे यांचे दि. ०८.०७.२०१६ च्या पत्रानुसार दि.०६.०७.२०१६ रोजी रमजान ईदची शासकीय सुट्टी होती. त्यामुळे विद्यार्थ्यांची गैरसोय होवु नये म्हणून द्वितीय गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी सदरचा कालावधी दि.११.०७.२०१६ सकाळी ११.०० ते सायं. ४.०० पर्यंत वाढविलेला आहे. तरी सदर विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. जे विद्यार्थी रु.५०/- भरुन आपला प्रवेश निश्चित करणार नाहीत असे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतुन बाहेर जातील व कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन प्रवेश (Offline) मिळणार नाही. म्हणून आपणांस जे कनिष्ठ महाविद्यालय मिळालेले आहे तेथे तात्पुरता प्रवेश दिलेल्या मुदतीत घ्यावा, असे आवाहन इ.११ वी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीकडुन करण्यात येत आहे. दि. ११.०७.२०१६ नंतर अशा विद्यार्थ्यांची कोणतीही तक्रार/विनंती ऐकुन घेतली जाणार नाही, तसेच यापुर्वी प्रसिध्द् केलेल्या दि.११ जुलै ते १५ जुलै २०१६ च्या वेळापत्रकात कोणताही बदल करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

MRaut
8.7.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१